संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# श्रीलंकेतील साखळी स्फोट धोक्याचा इशारा

**श्रीलंकेत** झालेले साखळी बॉम्बस्फोट जवळपास सव्वा दोनशे लोकांचे बळी घेणारे ठरले. यातून पुन्हा एकदा दहशतवादाचा विकृत चेहरा जगापुढे आला आहे. दहशतवाद संपवण्यासाठी सगळ्या जगाला एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही. असा स्पष्ट संदेश या हल्ल्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला. ईस्टर संडेचे निमित्त साधून कोलंबोतल्या चार पंचतारांकित हॉटेल्स आणि तीन चर्चमध्ये हे स्फोट घडवले गेले. तौहिथ जमाथ या दहशतवादी संघटनेने हे स्फोट घडवल्याचे स्पष्ट झाले आहे. हा हल्ला केवळ दहशत माजवण्याच्या उद्देशाने आणि आपली धर्मांधता सिध्द करण्यासाठीच स्फोट घडवून आणल्याचे दिसून येते. श्रीलंकेसारख्या छोट्या देशांमध्ये इतक्या भयानक पध्दतीचे घडवून आणले गेले. याचा अर्थ या छोट्या देशातही धार्मिक दहशतवादाची पाळेमुळे बरीच रुजल्याचे दिसून येतात. त्यापूर्वी तामिळी वाघ म्हणजेच लिबरेशन टायगर्स ऑफ तामिल ईलमने स्थानिक सिंहली जनतेविरुध्द हिंसाचार सुरू केला होता. जवळपास दोन दशके एलटीटीचा दहशतवाद श्रीलंकेने सहन केला होता. एलटीटीचा प्रमुख प्रभाकरन याच्या मृत्यूनंतर तो दहशतवाद कमी झाला किंबहुना संपुष्टात आणण्यात श्रीलंकेच्या लष्कराला यश आले होते. एलटीटीला श्रीलंकेमध्ये स्वतंत्र राज्य स्थापन करायचे होते आणि त्यासाठी हिंसाचाराचा मार्ग अवलंबला गेला होता. तिथे शांतता नांदावी म्हणून भारताने प्रयत्न केले. खास शांती सुरक्षादलही भारतातून पाठवले गेले होते. अर्थात भारताने घेतलेल्या या पुढाकाराची तेवढीच जबर किंमत भारताला मोजावी लागली. कारण याच तामिल ईलमच्या आत्मघातकी पथकाने राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. या सर्व पार्श्वभूमीवर श्रीलंकेत पुन्हा उफाळून आलेला कट्टरपंथियांचा हा नवा दहशतवाद श्रीलंकेबरोबरच भारतालादेखील धोकादायक ठरू शकतो. या हल्ल्यात एकूण चौदा परदेशी नागरिकांचा बळी गेला. त्यात तीन भारतीयांचाही समावेश आहे. हल्ल्यासाठी जो दिवस निवडला गेला त्यावरून धर्मांध कट्टरपंथियांना स्वतःची दहशत निर्माण करायची आहे हे स्पष्ट होते. हा सूडाचा प्रवास असून तो थांबवण्याकरीता जगाला एकत्र येऊनच संघटितपणे प्रयत्न करावे लागतील. हेच त्यातून स्पष्ट होते.

### सुरक्षिततेला ढिसाळपणा

यातला महत्त्वाचा भाग असाही आहे की, श्रीलंकेच्या पोलीस प्रमुखांनी दहशतवादी हल्ला होण्याची शक्यता दहा दिवसांपूर्वीच व्यक्त केली होती. प्रश्न असा उपस्थित होतो की एवढी माहिती पोलीस प्रमुखांपर्यंत पोहचली होती तर मग हा हल्ला रोखण्यासाठी पुरेशी उपाययोजना का होऊ शकली नाही. साधारणपणे गुप्तचर यंत्रणांकडून जेव्हा अशा हल्ल्यांचे संकेत मिळतात त्यावेळी देशभर हाय अलर्ट केला जातो. आणि ठिकठिकाणी नाकाबंदी करून कडेकोट अशी शोधमोहीम राबवली जाते. जगात अनेक देशांमध्ये दहशतवादी ज्या पध्दतीने हल्ले घडवून आणतात त्याची एक मोडस ऑपरेंडी ठरून गेली आहे. आत्मघातकी पथकांमार्फत हल्ले घडवताना हॉटेल्स, विमानतळ, लष्करी किंवा सैनिकी ठिकाणे सरकारी कार्यालये, टार्गेट केली जातात. आणि मग या सर्व ठिकाणांवर तितक्याच वेगाने शोधमोहीम राबवली जाते. हा हल्ला घडवणारे दहशतवादी २० एप्रिललाच श्रीलंकेत दाखल झाले होते. हॉटेल शँग्रिलामध्ये त्यांनी आपला मुक्काम ठोकला होता. पुढच्या तीन चार दिवसात त्यांनी श्रीलंकेच्या महत्त्वाच्या ठिकाणांवर स्फोट घडवण्याची योजना तिथेच बनवली. त्यांच्याकडे २५ किलोपेक्षा जास्त स्फोटके होती असेही आता तपासात निष्पन्न होत आहे. याचा अर्थ श्रीलंकेतल्या स्थानिक सुरक्षा यंत्रणा यासंदर्भात फारशा जागरूक नव्हत्या असे म्हणावे लागेल. कारण क्लोझ सर्किट टीव्हीच्या फुटेजमध्ये हे दहशतवादी काहीसे संशयास्पद परिस्थितीत वावरताना दिसतात. जर थोडी अधिक काळजी घेतली गेली असती आणि दहा दिवसांपूर्वीच दिलेला इशारा गांभीर्याने घेतला गेला असता तर आज दोनशेपेक्षा जास्त लोकांचे प्राण वाचू शकले असते. सुरक्षिततेतला हलगर्जीपणा हे देखील या हल्ल्यामागचे तितकेच मोठे कारण आहे. असे म्हणावे लागते. इतक्या उघडपणाने दहशतवादी तिथे वावरतात आणि त्याची कोणालाही शंका येत नसेल तर त्यातला ढिसाळपणा मान्य करावा लागेल. किंबहुना या ढिसाळपणाचाच गैरफायदा घेऊन दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य करून घेतले.

### मूळ शोधून काढा

खरे तर एलटीटीईच्या अनेक दहशतवादी कारवाया मोडून काढण्याचा श्रीलंकेतल्या सुरक्षा यंत्रणांना अनुभव आहे. साधारणपणे गेल्या पाच वर्षात तिथे कोणतीही मोठी अनुचित घटना घडलेली नाही किंवा दहशतवादी कृत्येही झालेली नाहीत. अशा प्रकारचा धार्मिक कट्टरपंथियांकडून तिथे हल्ला होईल. याचीही फारशी शक्यता नव्हती. सगळ्या जगाला शांततेचा आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या गौतम बुध्दांच्या देशात पुन्हा एकदा हिंसाचाराने डोके वर काढावे ही बाब निश्चितच चिंताजनक ठरते. असे दहशतवादी हल्ले भविष्यात घडू नयेत. म्हणून उपाययोजना तर कराव्या लागतीलच. परंतु या दहशतवाद्यांना जिथून रसद मिळते त्याचाही शोध घ्यावा लागेल. कारण भारत ज्या दहशतवादाचा बळी ठरला त्याचा उगम पाकिस्तानातून झालेला आहे. म्हणून ही दहशतवादी केंद्रे पाकिस्तानने नष्ट करावीत असे आवाहन भारताकडून वारंवार केले गेले. श्रीलंकेत या कट्टरपंथियांना अजिबात थारा मिळणार नाही. अशी तितकीच कडेकोट व्यवस्था श्रीलंकेला करावी लागेल. अन्यथा हा दहशतवाद श्रीलंकेसाठी कायमची डोकेदुखी ठरू शकेल. या बॉम्बस्फोटाने १९९३ साली मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांचीच आठवण करून दिली. भारत, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान काही प्रमाणात रशिया शिवाय अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स यासह अनेक युरोपिय देश या दहशतवादाच्या कचाट्यात सापडलेले आहेत. त्याचा बिमोड करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्रितपणे प्रयत्न करावे लागतील हे सिध्द होते.